पोलीस अधीक्षक, कार्यालय सोलापुर ग्रामीण.
Email-sp.solapur.r@mahapolice.gov.in

-: प्रेसनोट :- दिनांक :- २१/१०/२०२५

## ''पहाट उपक्रम'' अंतर्गत पोलीस अधीक्षक यांनी ''वंचितां सोबत दिवाळी साजरी केली''

मा. श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, यांचे पहाट उपक्रम सोलापूर ग्रामीण हद्दीमध्ये राबवण्यात येत असुन या उपक्रमाचा मुख्य उद्देश पारधी समाजातील बांधवांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे हा आहे.

पोलीस अधीक्षक, श्री. अतुल कुलकर्णी पहाट उपक्रमा अंतर्गत सोलापूर ग्रामीण हद्दीतील सोई सुविधापासुन वंचित असलेले पारधी समाजातील लोकांना दिवाळी उत्सव साजरा करता यावा, म्हणुन ''वंचितांची दिवाळी'' हा उपक्रम आयोजीत केला. या संकल्पनेतून सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सोलापुर तालुका, मोहोळ, वळसंग मंद्रूप, कामती, अक्कलकोट उत्तर, दक्षिण, करकंब, अकलुज, माळशिरस, वेळापुर, करमाळा, टेभुर्णी, कुर्डूवाडी, बार्शी शहर, बार्शी तालुका, वैराग, पांगरी, माढा यापोलीस ठाणे हददीतील पारधी समाजातील १५०० कुटुंबांना दिवाळी फराळ व संसारोपयोगी वस्तु उदा- चादर/ब्लॅकेट, साडी, किरणा साहित्य, इंत्यादी वस्तुचे वाटप करण्यात आले आहे. पारधी समाजातील लोकांना दिवाळीच्या निमीत्याने मा. पोलीस अधीक्षक, श्री. अतुल कुलकर्णी यांनी मोहोळ पोलीस ठाणे हद्दीतील चिचोळी काटी येथे प्रभारी अधिकारी श्री. हेमंत शेडगे व वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील होटगी येथे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विलास यामावार व प्रभारी अधिकारी श्री राहुल डोंगरे यांचे समवेत पारधी वस्तीवर जावून किट वाटप केले, तसेच इतर ठिकणी अपर पोलीस अधिक्षक, जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी स्टाफ सह पारधी वस्तीवर जावून किटचे वाटप केले. मा. पोलीस अधीक्षक यांनी उपस्थीतांना पारधी समाजतील मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे व पालकांनी शासनाकडून सुरु करण्यात आलेल्या विवीध योजनांचा लाभ घेवून प्रगतीकरावी असे मार्गदर्शन करून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

श्री. अतुल कुलकर्णी यांनी समाजातील तरुण मुले व मुली यांच्याशी संवाद साधून शिक्षणानुसार रोजगार संधी, तसेच स्वंयसेवी संस्थानाच्या माध्यमातुन महिलांना शिलाई मशिन, पिठाची गिरणी, पापड बनवण्याचे यंत्रे अशा रोजगाराच्या सुविधा उपलब्ध करण्यात येणार असुन या योजनाचा लाभ घ्यावा असे मार्गदर्शन केले. यापुर्वी मा. पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनामध्ये सोलापूर ग्रामीण हद्दीत रोजगार मेळावे घेण्यात आले होते. तसेच भविष्यात देखील कुशल व अकुशल तरुणांना लगतच्या औद्योगिक वसाहतीमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगीतले आहे.

सदर वंचितांची दिवाळी हा उपक्रम मा. श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, यांचे संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली श्री. प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बाजीराव पोवार, पोलीस कल्यान शाखा, तसेच जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस कल्याण शाखा व पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांनी उपक्रमा मध्ये सहभाग घेवुन सदरचा कार्यक्रम पारपाडला आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण**

**प्रति,**
**मा. संपादक,**
सदरची बातमी आपले वर्तमान पत्रात/चॅनेलवर प्रसिध्द करणेस विनंती आहे.